| | |
|---|---|
| स्वीकारल्याचा दिनांक | - २३/१०/२०२१ |
| नोंदणी दिनांक | -२३/१०/२०२१ |
| निकाल दिनांक | - २५/०३/२०२६ |
| कालावधी | - ४व, ५म, २दि. |

**न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग कवठेमहांकाळ, जिल्हा सांगली यांचे न्यायालयात**
**(पीठासीन अधिकारी - श्रीमती एन. एस. कदम)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.४३६/२०२१** **निशाणी क्र.३३**
CNR NO.MHSN070009222021
**(नियमित खटला)**

महाराष्ट्र शासन,
मार्फत –कवठेमहांकाळ पोलीस ठाणे,
ता.कवठेमहांकाळ, जि. सांगली. **अभियोगपक्ष.**

**विरुध्द**

सागर भगवान फाळके
वय २९ वर्षे,
राहणार मिरज, ता. मिरज,
जिल्हा सांगली. **आरोपी.**

.......................................................................................................

अभियोगपक्षातर्फे – सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.एस.एच.जाधव.
आरोपीतर्फे – विधीज्ञ श्री.आर.एम.पाटील.

.......................................................................................................

**भाग–'ब'**

| | |
|---|---|
| अपराध घडल्याची तारीख | २३.०१.२०२१ |

| | |
|---|---|
| प्रथम खबरी अहवालाची तारीख | २३.०१.२०२१ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | २३.१०.२०२१ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ३०.०८.२०२४ |
| न्यायनिर्णय राखून ठेवलेली तारीख | – |
| न्यायनिर्णयाची दिलेली तारीख | २५.०३.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख | – |

## आरोपीची माहिती

| अ.क्र | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | अपराध कलम | सोडून दिले किंवा शिक्षेचा तपशील | ठोठावलेली शिक्षा | संपरीक्षे दरम्यान आरोपी न्यायालयीन कोठडीत असल्यास त्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सागर भगवान फाळके | ०३.०२.२०२१ | ०३.०२.२०२१ | ३०४अ, २७९, ३३७, ३३८, ४२७ भादंवि व १८४ मो.वा. कायदा. | निर्दोष | निरंक | निरंक |

## भाग–क

## अभीयोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयीन साक्षीदार

| अ.क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| अ.सा.१ | साहेबराव शंकर जाधव. | खबरी. |
| अ.सा.२ | संभाजी भानुदास जाधव. | पंच. |
| अ.सा.३ | राजशेखर सुरेश सोळसे. | वाहन तपासणीस. |

| | | |
|---|---|---|
| अ.सा.४ | अजीत शामराव जाधव. | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार. |
| अ.सा.५ | सुभाष ज्ञानु पडळकर. | तपासी अधिकारी. |

**अभीयोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयीन निशाणी क्रमांकाची यादी**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | नि.पी.१४/अ.सा.१ | फिर्याद. |
| २. | नि.पी.१५/अ.सा.१ | प्रथम खबर अहवाल. |
| ३. | नि.पी.१७/अ.सा.२ | घटनास्थळ पंचनामा. |
| ३ | नि.पी.२३/अ.सा.३ | वाहन यांत्रीक तपासणीअहवाल. |
| ४. | नि.पी.२४/अ.सा.३ | वाहन तपासणी अहवाल. |
| ५. | नि.पी.३१/अ.सा.५ | गुन्हा तपास आदेश |

**ड. जप्त मुददेमाल**

| **अ.क्र.** | **वस्तु क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| – | – | – |

**न्यायनिर्णय**

(घोषीत दिनांक २५/०३/२०२६)

प्रस्तुतचा खटला आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता,१८६० चे कलम २७९, ३०४–अ, ३३७,३३८,४२७ व मोटार वाहने कायदा कलम १८४ अन्वयेच्या अपराधाबाबत चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाच्या खटल्याचा सारांश पुढीलप्रमाणे–**

२. दि. २३.०१.२०२१ रोजी सकाळी १०.०० वाजताच्या सुमारास खबरी यांचा मोठा भाउ विठ्ठल शंकर जाधव हा कुची येथे कामासाठी अॅक्टीव्हा

गाडी क्र. एम.एच–१०–बीबी–०३६५ घेवून गेला होता. त्यावेळी खबरी शेतात काम करीत असताना त्यांना त्यांचे शेजारी अजित शामराव जाधव यांचा ११.३० वाजता फोन आला की 'तुमचा भाउ विठ्ठल याचा मिरज पंढरपूर रोडला असलेल्या संजय शंकर शिंदे यांच्या शेताजवळ, कुची गावच्या हददीत डांबरी रस्त्यावर अपघात झाला आहे, तुम्ही त्याठिकाणी या'. त्यानुसार खबरी व शिवाजी भोसले यांनी घटनास्थळी येवून पाहिले असता खबरीचा भाउ विठ्ठल हा रस्त्याच्या उजव्या बाजूला साईडपटटीवर त्याच्या गाडीजवळ पडलेला दिसला. त्यावेळी खबरीच्या भावाच्या गाडीला पाठीमागून ठोकर देणारी स्वीफट गाडी क्र. एमएच–१०–सीए–४२१३ ही तेथे उभी होती. त्यावेळी खबरी, शिवाजी तुकाराम भोसले, प्रकाश भगवान जाधव व स्वीफट गाडीचा चालक सागर भगवान फाळके यांनी स्वीफट गाडी क्र. एमएच–१०–सीए–४२१३ मधून विठ्ठल यास कवठेमहांकाळ सरकारी दवाखान्यात आणले. तेथे डॉक्टरांनी विठ्ठल यांच्यावर प्राथमिक उपचार करुन पुढील उपचारासाठी सांगली येथील सिव्हील हॉस्पीटल येथे नेण्यास सांगितले. त्यानंतर विठ्ठल यास शिवाजी तुकाराम भोसले यांनी सिव्हील हॉस्पीटल, सांगली येथे नेले व त्यानंतर खबरी यांनी कवठेमहांकाळ पोलीस ठाणे येथे आरोपीविरुध्द तक्रार दाखल केली. सदर तक्रारीनुसार आरोपीविरुध्द गु.र.क्र.२६/२०२१ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पोलीस हवालदार श्री.एस.डी.पडळकर यांनी केला. तपासाअंती आरोपीविरुध्द त्यांनी न्यायालयात दोषारोप दाखल केले.

३. आरोपीविरुध्द निशाणी क्र. ११ अन्वये भारतीय दंड विधानाचे कलम २७९, ३०४–अ, ३३७, ३३८, ४२७ व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये निवेदन नोंदविण्यात आले. आरोपीचे प्रतिकथन नि.क्र.१२ वर नोंदवून त्याचे भाषेत

वाचुन व समजावुन सांगितले. आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे सांगितले व खटल्यास सामोरे जाण्याची इच्छा व्यक्त केली. खटल्याचे व पुराव्याचे दिर्घ स्वरुप बघता प्रस्तुतचा खटला नियमित खटला म्हणून चालविण्यात आला.

४. आरोपीविरुध्द आक्षेपार्ह पुरावा आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ (१) (ख) अन्वये बयाण नि.क्र. ३२ वर नोंदवण्यात आले. त्याच्याविरुध्द खोटा खटला दाखल केला असल्याचा बचाव आरोपीने घेतला आहे.

०५. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री एस. एच. जाधव व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर. एम. पाटील यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

०६. अभिलेखावर आलेला पुरावा पाहता आणि दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला असता खालील मुददे विचारार्थ आले असुन त्यावरील निष्कर्ष कारणेमिमांसेसहित खालीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, दिनांक २३.०१.२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजण्याच्या सुमारास मौजे कुची, ता. कवठेमहांकाळ गावच्या हददीत, राष्ट्रीय महामार्ग क्र. १६६ वर, आरोपीने त्याच्या ताब्यातील स्वीफट डिझायर वाहन क्र. एमएच–१०–सी–४२१३ निष्काळजीपणे व हयगयीने मानवी जिवीतास धोका उत्पन्न होईल अशा पध्दतीने चालविली ? | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| २. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद स्वीफट वाहन निष्काळजीपणे व हयगयीने चालवुन वाहन क्र. एमएच–१०–बीबी–०३६५ अॅक्टीव्हावरील विठ्ठल शंकर जाधव यांना धडक देवून त्यांचे मरणास कारणीभुत झाला? | नकारार्थी |
| ३. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद स्वीफट वाहन निष्काळजीपणे व हयगयीने चालवुन त्याद्वारे विठ्ठल शंकर जाधव यांच्या वाहनास धडक देवून त्यांना किरकोळ जखमी केले? | नकारार्थी |
| ४ | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद स्वीफट वाहन निष्काळजीपणे व हयगयीने चालवुन त्याद्वारे विठ्ठल शंकर जाधव यांच्या वाहनास धडक देवून त्यांना गंभीर जखमी केले? | नकारार्थी |
| ५ | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद स्वीफट वाहन बेदरकारपणे, निष्काळजीपणाने चालवून अपघातामध्ये दोन्हीही वाहनांचे नुकसान केले ? | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| ६. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, वर नमूद तारीख वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील उपरोक्त नमूद स्वीफट वाहन रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन भरधाव वेगाने लोकांना धोका निर्माण होईल अशा परिस्थीतीत चालवली ? | नकारार्थी |
| ७. | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता |

## <u>कारणमिमांसा</u>

### <u>मुद्दे क्रमांक १ ते ६ करीताः-</u>

०७. मुद्दे क्रमांक १ ते ६ हे एकाच घटनेतुन निर्माण झाल्याने, परस्परांशी संबंधीत असल्याने व आलेल्या पुराव्याची पुनरावृत्ती टाळणेकामी त्यांची कारणमिमांसा ही एकत्रित केली आहे.

०८. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता आरोपीने त्याच्या ताब्यातील स्वीफट डिझायर वाहन क्र. एमएच–१०–सी–४२१३ बेदरकारपणे व निष्काळजीपणाने चालवुन विठ्ठल शंकर जाधव यांच्या अॅक्टीव्हा वाहन क्र. एमएच १० बीबी ०३६५ यास धडक देवून त्यांना किरकोळ व गंभीर दुखापती होण्यास व विठ्ठल जाधव यांच्या मृत्युस कारणीभुत ठरल्याचे तसेच दोन्ही वाहनांच्या नुकसानीस कारणीभूत ठरल्याचे अभियोग पक्षाला सिध्द करणे आवश्यक आहे.

०९. आरोपीवरील आरोप सिध्द करण्यासाठी अभीयोग पक्षातर्फे तपासलेल्या साक्षीदारांपैकी सा.क्र. ४ अजित शामराव जाधव यांना प्रत्यक्षदर्शी साक्षीदार म्हणून तपासण्यात आले आहे. त्यामुळे सदर साक्षीदाराचा पुरावा हा प्रस्तुत

प्रकरणातील महत्वाचा पुरावा ठरतो. यास्तव सा.क्र. ४ अजित जाधव यांचा पुरावा सर्वप्रथम विचारात घेण्यात येत आहे. सदर साक्षीदाराने आपल्या पुराव्यात असे कथन केले आहे की, दि.२३.०१.२०२१ रोजी ते किराणा माल आणण्यासाठी कुची गावामध्ये गेले होते. किराणा माल घेवून येत असताना संजय शिंदे यांच्या शेताजवळ असलेल्या रस्त्यावर स्वीफट कार क्र. एमएच–१०–सीए–४२१३ व अॅक्टीव्हा क्र. एमएच–१०–डीबी–०३६५ या वाहनांचा अपघात त्यांच्या समक्ष झाला होता. त्यावेळी सदर अपघातातील अॅक्टीव्हा गाडी ही त्यांच्या गावातील विठ्ठल शंकर जाधव हे चालवित होते. सदर अपघातामुळे त्यांच्या डोक्याला व इतर शरीराला जखमा झाल्या होत्या. त्यानंतर त्यांनी जखमी विठ्ठल जाधव यांचा भाउ साहेबराव जाधव यांना फोन करुन अपघाताची माहिती दिली होती. सदर अपघातामुळे स्वीफट गाडीचे बोनेट आत गेले होते. अॅक्टीव्हा गाडीचे पाठीमागील बाजूचे नुकसान झाले होते. त्यानंतर साहेबराव जाधव घटनास्थळी आल्यानंतर अपघातीत स्वीफट वाहनामध्ये विठ्ठल जाधव यांना सरकारी दवाखान्यात नेण्यात आले.

१०. जखमी यांचे भाउ साहेबराव जाधव हे प्रस्तुत प्रकरणातील खबरी असून त्यांनी आपल्या पुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, दि. २३.०१.२०२१ रोजी सकाळी १०.०० वाजण्याच्या सुमारास त्यांना अजित जाधव यांचा फोन आला व त्यांचा भाउ विठ्ठल यांचा मिरज–पंढरपूर रस्त्यावर, एस आर धाब्यासमोर अपघात झाला असल्याचे त्यांना कळाले. त्यानंतर ते अपघातस्थळी गेले तेव्हा त्यांच्या भावाची मोटारसायकल स्कुटी पडली होती. तसेच त्यांचा भाउ विठ्ठल त्याठिकाणी पडला होता व त्याच्या डोक्याला मार लागला होता. त्याठिकाणी एक एमएच–१०–सीए–४२१३ हे चारचाकी वाहन उभे होते. त्यानंतर सदर चारचाकी वाहनचालक

यांच्या मदतीने त्यांच्या चारचाकी गाडीमध्ये जखमी विठ्ठल याला कवठेमहांकाळ उपजिल्हा रुग्णालय येथे नेण्यात आले. त्यानंतर जखमी यांना पुढील उपचारासाठी सांगली येथील रुग्णालयात नेण्यात आले. पुढे चौकशी केल्यानंतर त्यांना असे समजले की, आरोपी फाळके याने त्याच्या ताब्यातील वाहनाने त्यांच्या भावाच्या मोटारसायकलला पाठीमागून धडक दिल्यामुळे सदरचा अपघात झाला होता. त्यानुसार त्यांनी कवठेमहांकाळ पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली होती. सदर साक्षीदार यांनी आपल्या पुराव्यात त्यांच्या वर्दीजबाबातील व प्रथम खबर अहवालातील मजकूर मान्य केला असून त्यानुसार त्यास अनुक्रमे निशाणी क्र.१४ व १५ देण्यात आले आहेत.

११. वरील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार व खबरी यांच्या पुराव्याचे अवलोकन केले. प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांनी आपल्या पुराव्यामध्ये त्यांचे समक्ष स्वीफट कार क्र.एमएच–१०–सीए–४२१३ व अॅक्टीव्हा गाडी क्र. एमएच–१०–बीबी–०३६५ या वाहनांचा अपघात झाला असल्याचे कथन केले आहे. परंतु सदर अपघात कसा झाला, जखमी विठ्ठल जाधव यांची गाडी कुठे होती व आरोपी यांची स्वीफट गाडी कुठे होती याबाबत त्यांनी आपल्या सरतपासामध्ये कोणतेही कथन केले नाही. तसेच त्यांनी आपल्या उलटतपासामध्ये त्यांनी प्रत्यक्ष अपघात घडताना पाहिले नसल्याचे कथन केले आहे. त्यामुळे सदर साक्षीदाराच्या पुराव्यावरुन अपघात कसा घडला व त्या अपघातामध्ये आरोपीची चुक होती किंवा कसे याबाबतचा कोणताही पुरावा अभीलेखावर आलेला नाही. सा.क्र.१ साहेबराव जाधव यांनी आपल्या पुराव्यामध्ये असे कथन केले आहे की आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहनाने त्यांचा भाउ विठ्ठल यांच्या मोटारसायकलला पाठीमागून धडक दिल्यामुळे सदरचा अपघात झाला

असल्याचे त्यांना कळाले. परंतु सदर माहिती त्यांना कोणाकडून व कशी मिळाली याबाबत त्यांनी आपल्या पुराव्यात कोणतेही कथन केले नाही. त्यामुळे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार व खबरी यांच्या पुराव्यामधून आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन हयगयीने व अविचाराने चालविल्यामुळे अपघात घडला असल्याबाबतचा कोणताही प्रत्यक्ष पुरावा अभीलेखावर आलेला नाही. यास्तव प्रस्तुत प्रकरणामध्ये सदर गुन्हयाबाबतचा प्रत्यक्ष पुरावा अभीलेखावर नसल्याने अभीलेखावरील परिस्थीतीजन्य पुराव्याचे अवलोकन करणे न्यायोचित ठरते.

१२. सा.क्र. ५ सुभाष पडळकर हे प्रस्तुत प्रकरणातील तपासिक अधिकारी असून त्यांनी आपल्या पुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, दि. २३.०१.२०२१ रोजी गुन्हा नोंद क्र. २६/२०२१ चा तपास त्यांच्याकडे वर्ग करण्यात आला होता. सदर गुन्हयातील प्रथम खबर अहवालाचे अवलोकन केले असता कुची गावच्या हद्दीत एक स्वीफट गाडी व अॅक्टीव्हा गाडीचा अपघात झाला होता. त्यानुसार त्यांनी घटनास्थळी जावून दोन पंचासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला व घटनास्थळाचा हातनकाशा तयार केला. प्रस्तुत प्रकरणातील घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच साक्षीदार संभाजी भानुदास जाधव (सा.क्र.२) यांनी आपल्या पुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, दि. २३.०१.२०२१ रोजी मिरज–पंढरपूर रस्त्यावर संजय शिंदे यांच्या मळयाजवळ पोलिसांनी त्यांच्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला होता. त्याठिकाणी एक स्कुटी पडली होती व त्या स्कुटीचे नुकसान झाले होते. पाठीमागचा लाईट फुटलेल्या होत्या तसेच त्याठिकाणी एक एमएच१०–सीए–४२१३ हे चारचाकी वाहन उभे होते. त्या वाहनाचे समोरच्या बाजूचे नुकसान झाले होते. त्या रस्त्यावर वाहनाच्या तुटलेल्या लाईटचे तुकडे पडले होते.

ब्रेकचे व्रण रस्त्यावर उमटलेले होते. तसेच त्याठिकाणी रस्त्यावर रक्त पडलेले होते. पोलिसांनी त्यांचेसमक्ष घटनास्थळ पंचनामा व हातनकाशा तयार केला असून त्या घटनास्थळ पंचनाम्यातील व हात नकाशातील मजकूर खरा व बरोबर असल्याचे त्यांनी मान्य केले आहे. घटनास्थळ पंचनाम्यास नि.क्र. १७ देण्यात आली आहे.

१३. अभीलेखावरील तपासी अधिकारी व घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच यांच्या तोंडी पुराव्याचे अवलोकन करुन नि.क्र.१७ वरील घटनास्थळ पंचनाम्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, मिरज–ते पंढरपूर जाणारे रोडवर संजय शंकर शिंदे यांच्या शेताजवळ घटनास्थळ असून सदर घटनास्थळावर हायवे रोडवर दक्षीण रोडचे साईडपटटीवर एक अॅक्टीव्हा जिचा क्र. एमएच१०–बीबी–०३६५ ही पडलेली दिसत असून गाडीचे पाठीमागील बाजूने इंडिकेटर, गार्ड तसेच समोरील हेडलाईट हॅण्डल वाकून सुमारे पाच हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. तसेच त्याच्या पाठीमागे उभी असलेली स्वीफट डिझायर गाडी जिचा नोंदणी क्र. एमएच१०–सीए–४२१३ हिचे समोरील गार्ड वाकून सुमारे सहा हजार रुपयांचे नुकसान झाले असल्याचे दिसून येत आहे. तसेच सदर ठिकाणी रोडवर गाडीचे ब्रेक मारलेले टायर मार्क्स दिसत आहेत. सदर ठिकाणी फायबरचे तुकडे पडलेले दिसत आहेत. तसेच अॅक्टीव्हा गाडीवरील चालक यांचे रक्त पडलेले दिसत आहे. त्यानुसार हातनकाशामध्ये देखील एक मोटारसायकल व त्यामागे एक चारचाकी गाडी दाखविण्यात आली आहे. सदर पंचनामा हा १५.३० वाजता सुरु होवून १६.१५ वाजता पूर्ण झालेला आहे.

१४. अभीलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले असता सा.क्र. ४ अजित जाधव हे सर्वप्रथम घटनास्थळी हजर असून त्यांनी खबरी यांना फोनव्दारे अपघाताची

माहिती दिली आहे. त्यानंतर खबरी हे अपघातस्थळावर पोहोचल्यानंतर त्यांनी जखमी विठ्ठल शंकर जाधव यांना अपघातीत वाहन स्वीफट गाडीमधून उपजिल्हा रुग्णालय, कवठेमहांकाळ येथे नेले असल्याचे कथन आपल्या पुराव्यामध्ये केले आहे. म्हणजे अपघातानंतर सदर अपघातीत स्वीफट गाडी ही घटनास्थळावरुन कवठेमहांकाळ उपजिल्हा रुग्णालय येथे गेलेली होती. त्यानंतर तपासी अधिकारी यांनी नि.क्र.१७ प्रमाणे पंचनामा हा १५.३० वाजता केला असून सदर पंचनाम्यामध्ये घटनास्थळावर अपघातीत मोटारसायकलच्या पाठीमागे अपघातीत स्वीफट गाडी उभी असल्याचे दर्शविले आहे. त्यामुळे घटनास्थळावर प्रत्यक्ष हजर असलेले साक्षीदार यांचा पुरावा की घटनास्थळावरुन अपघातीत स्वीफट गाडी निघून गेल्याचे व त्यानंतर घटनास्थळ पंचनाम्याच्यावेळी अपघातीत स्वीफट गाडी हजर असल्याचे अशा दोन विरोधाभासी गोष्टी अभीलेखावर आल्या आहेत. त्यामुळे घटनास्थळ पंचनाम्यातील कथनांवर संशय निर्माण होत आहे.

१५. अभीलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले असता घटनास्थळावर सर्वप्रथम हजर असलेली व्यक्ती अजित जाधव (सा.क्र. ४) यांनी अॅक्टीव्हा गाडीचे पाठीमागील बाजूचे संपूर्ण नुकसान झाल्याचे कथन केले आहे. तसेच घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच साक्षीदार यांनी देखील अपघातीत स्कुटीचा पाठीमागचा लाइट तुटला होता असे कथन केले आहे. परंतु घटनास्थळ पंचनाम्यामध्ये अॅक्टीव्हा गाडीचे पाठीमागील बाजूचे इंडीकेटर, गार्ड तसेच समोरील हेडलाईट फुटून हॅण्डल वाकले असल्याचे कथन केले आहे. तसेच तपासी अधिकारी यांनी अपघातीत वाहने यांत्रीक तपासासाठी राजशेखर सोळसे (सा.क्र.३) यांच्याकडे पाठविल्याचे आपल्या पुराव्यामध्ये कथन केले आहे. त्यानुसार यांत्रीक तपासणी अधिकारी राजशेखर

सोळसे (सा.क्र.३)यांनी आपल्या पुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, अॅक्टीव्हा गाडीचे पुढील भाग खराब होवून मडगार्ड चेपल्याचे उजव्या बाजूचा आरसा फुटल्याचे, हेडलाईट फुटल्याचे व मागील गार्ड देखील चेपल्याचे कथन केले आहे. त्यामुळे अपघातीत अॅक्टीव्हा गाडीचे मागच्या बाजूचे नुकसान झाले होते किंवा मागच्या व पुढच्या बाजूचे नुकसान झाले होते याबाबतच्या अभीयोग पक्षाच्या पुराव्यामध्ये तफावत आढळून येत आहे. यास्तव अभीयोग पक्षाने दाखल केलेला पुरावा यानुसार अपघातीत वाहनांची स्थिती, अपघातीत मोटारसायकलचे झालेले नुकसान यामध्ये आलेली तफावत दुर्लक्षीत करण्यासारखी नाही.

अभीलेखावरील संपूर्ण पुराव्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, सदर अपघात आरोपीने त्याच्या ताब्यातील स्वीफट वाहन भरधाव वेगाने, रस्त्याच्या परिस्थितीकडे दूर्लक्ष करुन चालविल्यामुळे झाला असल्याबाबतचा कोणताही प्रत्यक्ष किंवा परिस्थीतीजन्य पुरावा अभीलेखावर उपलब्ध नाही. यास्तव अभीयोग पक्ष सर्व संशयांपलिकडे हे सिध्द करण्यास असमर्थ ठरला आहे की, आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणे, रस्त्याच्या परिस्थीकडे दुर्लक्ष करुन चालविल्यामुळे तो सदर अपघात घडण्यास व जखमी विठ्ठल यांना किरकोळ व गंभीर दुखापती होण्यास व त्यानंतर त्यांचा मृत्यु होण्यास व उभय वाहनांचे नुकसान होण्यास कारणीभूत ठरलेला आहे. सबब मुददा क्र.१ ते ६ चे निष्कर्ष नकारार्थी देण्यात येत आहे.

**<u>मुद्दा क्र. ७ करिता :</u>**

१६. ज्याअर्थी, अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द ठेवलेले दोषारोप सिध्द केले नाहीत. त्याअर्थी, आरोपीला निर्दोष मुक्त करणे आवश्यक आहे. वरील चर्चेच्या

अनुषंगाने मुद्दा क्र. ७ चे उत्तरासाठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. आरोपी सागर भगवान फाळके यांची फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम २४८ (१) अन्वये भारतीय दंड संहिता,१८६० चे कलम ३०४–अ, २७९, ३३७, ३३८, ४२७ व मोटार वाहन कायदे कलम १८४ अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे बंधपत्र व जमानत पत्र रदद करण्यात येते.

३. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७–अ च्या अनुपालनाकरीता आरोपीने रक्कम रुपये पन्नास हजार रुपयांचे बंधपत्र आणि जमानत पत्र दयावे.

४. न्यायनिर्णयाची प्रत फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३६५ अन्वये जिल्हा दंडाधिकारी, सांगली यांना पाठविण्यात यावी.

KADAM NUTAN SACHIN
Digitally signed by KADAM NUTAN SACHIN
Date: 2026.04.01 11:36:19 +0530

ठिकाणः- कवठेमहांकाळ. **(श्रीमती एन एस कदम)**
दिनांकः- २५.०३.२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कवठेमहांकाळ.

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same, word to word, as per the original Judgment.

Name of the Stenographer - H. P. Haridas
Court - CJJD and JMFC, Kavathemahankal.
Date -25-03.2026
Order signed by the
Presiding Officer on -25-03.2026
Order uploaded on 01-04.2026